मनःशांतीसाठी भगवद्गीता

डॉ.पद्मा मोहनराव जाधव-वाखुरे
सहयोगी प्राध्यापक,
शासकीय अध्यापक महाविद्यालय,
सी.टी.ई.परभणी.

प्रास्ताविक :

आज संपूर्ण जग तणावग्रस्त असल्याचे आपणास जाणवते. या ताणतणावांची कारणे भिन्न भिन्न असू शकतील, मात्र या ताणतणावांनी संपूर्ण जग मनःशांती हरवून बसले आहे याची प्रकर्षाने जाणीव होते. मनःशांती हरवून बसलेल्या समाजाला, मानवाला जीवनातील आनंदाची अनुभूती घ्यावयाची असेल तर त्यासाठी आपल्या धर्मग्रंथामधील तत्त्वज्ञानाचा, मार्गदर्शक तत्त्वांचा आधार घ्यावा लागेल मग तो कोणत्याही धर्मग्रंथ असो. त्या धर्मग्रंथामधील तत्त्वज्ञान अखिल मानवजातीला मार्गदर्शक ठरणारे असेच आहे. त्यापैकीच एक धर्मग्रंथ म्हणजे भगवदगीता होय.

संपूर्ण विश्वाचे कल्याण चिंतिणारा, जरी हिंदू धर्माचा पवित्र धर्मग्रंथ मानला जात असला तरी अखिल मानवजातीला मार्गदर्शक ठरणारा ग्रंथ म्हणजे भगवद्गीता होय. अखिल जगाला उपकारक ठरणारे व जीवनस्पर्शी तत्त्वज्ञान त्यामध्ये सामावलेले आहे. जगातील तत्त्वज्ञानविषयक अनेक ग्रंथांच्या मालिकेतील एक तत्त्वपर व नीतिपर असा अत्यंत प्रभावी संस्कृत ग्रंथ म्हणजे भगवद्गीता होय. गीता ही अठरा अध्यायांची व सातशे श्लोकांची आहे. प्रस्तुत लेखात मनःशांतीसाठी भगवद्गीता या अनुषंगाने गीतेतील तत्त्वमीमांसा, ज्ञानमीमांसा आणि मूल्यमीमांसा या संदर्भातील विचार मांडण्याचा प्रयत्न आहे.

भारतीय तत्त्वज्ञान व अध्यात्मिकतेचे परिपक्व, सुमधुर फळ म्हणजे भगवद्गीता होय. कर्तव्यमोहामध्ये सापडलेल्या मनुष्याला मोक्षोपायाचा उपदेश करणारा एक महान ग्रंथ आहे. मनुष्याला व्यावहारिक कार्ये करत करत ब्रह्मज्ञान व भक्ती यांच्या सहाय्याने मोक्ष कसा प्राप्त करावा याचे विवेचन गीतेमध्ये अत्यंत सहजपणे करण्यात आलेले आहे. कर्म-अकर्म, धर्म-अधर्माचे निरूपण करणारे ते एक आर्ष महाकाव्य आहे.

गीता हा भागवत धर्माचा प्रधान ग्रंथ आहे. आत्मविद्येची पवित्र तत्त्वे निःसंदिग्धपणे सांगून मनुष्याला परमपुरूषार्थाची ओळख करून देणारा, कर्म-ज्ञान-भक्ती यांचा समुच्च सांगणारा, विशाल निष्काम कर्माची प्रेरणा देणारा एक प्रधान ग्रंथ म्हणजे गीता होय. या ग्रंथाची जगातील विविध भाषांमध्ये भांषातरे झालेली आहेत. जगाच्या वाङमयात एवढया भाषांमध्ये भाषांतरे झालेला ग्रंथ सापडणे दुर्मिळच आहे असे गौरवोद्गार लोकमान्य टिळकांनी गीतेच्या संदर्भात काढलेले आहेत.

भारतीय तत्त्वज्ञानात गीतेचे स्थान अत्यंत उच्च आहे. किबंहुना जगाच्याही तत्त्वज्ञानात गीतेचे तत्त्वज्ञान अत्यंत वरचे आहे. भारतीय तत्त्वज्ञानात उपनिषदांच्या बरोबरीने गीतेला मान आहे. समाजाच्या ऐहिक कल्याणातच व्यक्तीचा परमार्थ सिद्ध व्हावा या गीतेचा उदात्त हेतू आहे. गीता ही दुःखवादी, दैववादी किंवा निवृत्तिवादी नसून आनंदवादी आणि कर्मवादी आहे. गीतेचा आनंदवाद हा काल्पनिक नसून तो सत्य सृष्टीत अनुभवण्याजोगा आहे. यामुळेच गीतेतील विवेचन अत्यंत बुध्दिग्राहय आहे असे डॉ.बेझंट, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी आाणि अनेक पाश्चात्य विद्वानांचे मत आहे. यावरूनच गीतेची महनीयता सिद्ध होते.

भगवद्गीतेतील तत्त्वमीमांसा

भगवद्गीतेतील तत्त्वज्ञान हे ईश्वराचे अस्तित्व मान्य करणारे असे आस्तिक तत्त्वज्ञान आहे. असे असले तरी ईश्वराचे नेमके स्वरूप ठरविण्यापेक्षा त्याच्या प्रत्यक्ष प्राप्तीच्या मार्गाकडे अधिक लक्ष पुरविण्याची प्रेरणा गीता देते. म्हणूनच गीतेमध्ये सगुण - निर्गुण अशा स्वरूपात ईश्वराचे वर्णन आलेले दिसते. गीतेच्या बाराव्या अध्यायन सगुणोपासना व अव्यक्तोपासना यांचा उल्लेख आलेला आहे. तात्त्विकदृष्टया परब्रह्म निर्गुण निराकार असले तरी भक्तीसाठी जवळीक असणारा परम कारूणिक सखा, कैवारी असा ईश्वर उपासनेसाठी महत्त्वाचा मानला आहे. अशी उपासना ही मनःशांतीसाठी एक माध्यम म्हणून उपयुक्त आहे.

इंद्रियांना अगोचर असे ईश्वराचे स्वरूप श्रेष्ठ आहे. मात्र योगमायेने ते झाकाळलेले असते त्यामुळेच ते ओळखण्यास कठीण जाते असे सातव्या अध्यायातील चोवीस-पंचवीसाव्या श्लोकात म्हटले आहे. परब्रह्म अविनाशी, नित्य, अकर्ता आहे आणि हा सर्व खेळ प्रकृतीचाच आहे. ईश्वरीतत्त्व हे गुणातीत, स्थित, सनातन, अचिंत्य, आश्चर्यमय व अविकारी आहे. याला शस्त्रे तोडीत नाहीत, अग्नी जाळीत नाही, पाणी भिजवीत नाही, वायू, सुकवित नाही.

नैनं छिन्दन्ति शस्त्राणि नैनं दहति पावकः ।
न चैनं क्लेदयन्त्यापो न शोषयति मारूतः ।।

ज्याप्रमाणे सूर्य जगाला सतत प्रकाश देतो पण स्वतः मात्र अलिप्त राहतो त्याचप्रमाणे आत्मा शरीराला प्रकाशित करून अलिप्त राहतो.

सगुण बह्म किंवा ईश्वर हे सर्व भूतांचे मूळ, बीज आहे (११.३९) आणि तोच त्रैलोक्याचे पोषण करतो (१५.१७) व तोच लोकांचा क्षय करतो (११.३२) असा विविध अध्यायांतील श्लोकांमध्ये, ब्रह्माच्या स्वरूपाचा विचार आलेला आहे. गीतेमध्ये सर्व अचेतन पदार्थांना 'क्षर-पुरूष', त्यांना व्यापून राहणा-या आत्म्याला 'अक्षर पुरूष' आणि या दोहांवरती सत्ताचालवणा-या परमात्म्याला 'उत्तम पुरूष' असे म्हटले आहे. पंचतत्त्वे, मन, बुध्दी आणि अहंकार या सर्वांनी मिळून ईश्वराची अष्टधा प्रकृती होते (७.४-६). अष्टधा प्रकृती ही अपराप्रकृती व पुरूष म्हणजे पराप्रकृती यांच्यापासून सर्व स्थावर-जंगम सृष्टी निर्माण होते. हे विश्व त्रिगुणात्मक प्रकृतीचा पसारा असून प्रत्येक वस्तूत हे तीनही गुण एकत्र असतात. प्रकृतीपासून उत्पन्न झालेल्या सत्त्व-रज-तम या गुणांनी आत्मा देहात

बांधला जातो. सत्त्वसुख-ज्ञानाने, रज तृष्णा-आसक्तीने, आणि तम आळस-निद्रेन बांधले जातात. माया किंवा अज्ञान त्रिगुणात्मक देह इंद्रियाचा धर्म आहे. मायेने ज्यांचे ज्ञान नष्ट होते त्या लोकांना गीतेत मूढ व आसुरी वृत्तीचे लोक मानले आहे. आणि असे लोक ईश्वरास शरण जात नाहीत त्यामुळे ते नरकाचे धनी होतात असा उल्लेख गीतेमध्ये आलेला आहे.

जीव हा ईश्वराचा अंश असून (१५-७-६), प्रकृतीत असणारी मन व पाच इंद्रये तो आपल्याकडे ओढून घेतो. यांनीच लिंगशरीर बनते. जीव इंद्रिये व मन यांच्या ठिकाणी राहून गुणांनी युक्त होतो आणि विषयांचा उपभोग घेतो. देह धारण करणा-यास बालपण - तरूणपण - म्हातारणपण त्याचप्रमाणे मरणही प्राप्त होते. जुन्या वस्त्रांप्रमाणे हा जुने शरीर त्याग करून नवीन शरीर धारण करतो. उत्पति-स्थिती-लय हे तत्त्व विश्वातील प्रत्येक पदार्थाला लागू पडते असे यातून सूचित होते.

गीतेच्या प्रत्येक अध्यायाच्या शेवटी संकल्पात ब्रह्मविद्या व योगशास्त्र असे म्हटलेले आहे. ब्रह्मविद्या ही गीताशास्त्राची सैद्धांतिक बाजू आहे. जगातील सत्तत्त्वांचे ज्ञान म्हणजे ब्रह्मविद्या, पराविद्या किंवा आत्मबोध होय. तर योगशास्त्र ही गीताशास्त्राची व्यावहारिक बाजू आहे. आपले परमसाध्य जाणून घेवून त्याच्या प्राप्तीसाठी आयुष्यक्रमण करण्यासाठी योगमार्ग अनुसरणे म्हणजे योगशास्त्र होय.

गीतेतील तत्त्वमीमांसा अथवा सत्राशास्त्राचा विचार केल्यास असे म्हणता येईल की, विश्वाचे स्वरूप, मानवाचे आणि मानवाच्या अस्तित्वाचे स्वरूप यांचे अत्यंत सूक्ष्मपणे विवेचन गीतेमध्ये करण्यात आलेले आहे. या भक्कम आणि समृध्द तात्त्विक अधिष्ठानामुळेच भगवद्गीता हा श्रेष्ठ प्रतीचा ग्रंथ ठरला आहे.

भगवद्गीतेतील ज्ञानमीमांसा

भगवद्गीतेमध्ये बुध्दिवाद पहावयास मिळतो. कारण भगवद्गीता ही वैदिक परंपरेत मुरली असली तरी वेदांच्या मागे अंधपणे न जाता तिच्याद्वारे बुध्दिवादी दृष्टिकोनातून ज्ञानाचे तर्कशुध्द विवेचन झालेले दिसून येते. स्थूल बाह्य पदार्थांच्या तुलनेत इंद्रिये श्रेष्ठ, त्यापलिकडे मन, मनापलिकडे बुध्दी व बुध्दी पलीकडे आत्मा अशी श्रेणी गीतेमध्ये पहावयास मिळते. इंद्रिये बाह्य संस्कार ग्रहण करतात, मन त्यांची व्यवस्था लावते, बुद्धी निवडानिवड करते असे विवेचन आहे. म्हणजेच बाहयसृष्टीच्या ज्ञानग्रहणाचा विचार भगवद्गीतेत आला आहे.

गीतेमध्ये ईश्वराचे ज्ञान अथवा पराविद्या, ब्रह्मविद्या याअर्थी ज्ञान ही संकल्पना वापरलेली आहे. आत्मज्ञान, स्वरूपाचे दर्शन ज्ञान (१३-११). ज्ञानाने स्वरूपाचा, विश्वरूपाचा बोध होतो. आत्मरूप जाणणे यासारखे या जगात पवित्र दुसरे काहीही नाही.

गीतेच्या सातव्या अध्यायातील श्लोक दोन मधील ज्ञान व विज्ञान यांचे स्पष्टीकरण लोकमान्य टिळकांनी ज्ञान म्हणजे समाविष्टरूप पाहणे व विज्ञान म्हणजे व्यष्टियरूपज्ञान किंवा त्या एकापासून सर्व विस्तार कसा झाला आहे हे जाणणे असे केले आहे. तसेच ज्ञान म्हणजे व्यवहित ज्ञान आणि

विज्ञान म्हणजे अव्यवहित ज्ञान किंवा साक्षात्कार असा देखील ज्ञान – विज्ञानाचा अर्थ आहे. ज्ञान तीन प्रकारचे असून नानातत्त्वात एकत्र पाहणारे 'सात्त्विक ज्ञान', नाना तत्त्वांचे ज्ञान म्हणजे 'राजसज्ञान' व एकाच गोष्टीत मन गुंतून तेच सर्वस्व आहे असे मानणे हे 'अल्पज्ञान' किंवा 'तमसज्ञान' म्हटले आहे.

भगवद्गीता यथार्थ ज्ञानाच्या प्राप्तीचा मार्ग अनुसरण्याची प्रेरणा देते. त्यानुसार ज्ञानप्राप्तीच्या मार्गात संशयात्म्याला कुठेच जागा नाही. ज्याचे संशय ज्ञानाने छिन्न झाले त्या आत्मज्ञान्याला कर्म बाधत नाही. सर्व प्रकारच्या यज्ञात ज्ञानयज्ञ म्हणजे परमेश्वराचे ज्ञान करून घेवून तद्नुरूप वर्तनाने परमेश्वरप्राप्तीचा मार्ग धरणे श्रेष्ठ आहे. हा मार्ग मानस व बुद्धिसाध्य असून सर्व कर्मांचा नाश करतो. परमेश्वरज्ञानाशिवाय मोक्ष अशक्य. निर्गुण स्वरूप ज्ञानदृष्टीने ओळखणे, हीच ज्ञानाची परमावधि होय. पण याबाबतीत आपले ज्ञान मर्यादित आहे. त्याच्या सत्यस्वरूपाचे ज्ञान फक्त त्यालाच असू शकेल. गीतेमध्ये भगवान सांगतात की, मीच सर्वांना जाणतो, पण मला कुणी जाणत नाहीत (७-२६). तसेच ज्ञानगम्य म्हणजेच ज्ञानाने कळणारा ईश्वर, ज्ञान व ज्ञेयही आहे असे म्हटले आहे. (१३-१७). म्हणजे अंतिम ज्ञाता तो, ज्ञान तो आणि ज्ञेयही तोच असा त्रिपुटीलयाचा विचार गीतेत आलेला आहे.

असे ज्ञान प्राप्त करण्यासाठी व्यक्तिजवळ नम्रता असली पाहिजे. 'तद्विद्धि प्रणिपातेन सेवया' तुला जर विद्या प्राप्त करावयाची असेल तर तुझ्याजवळ प्रणिपात म्हणजे नम्रता असणे अत्यंत आवश्यक आहे. नम्रतेशिवाय ज्ञान मिळत नाही, ज्ञान मिळाले तर ते टिकत नाही आणि टिकले तर शोभत नाही. 'विद्या विनयेन शोभते' या उक्तीप्रमाणे विद्या आणि विनय (नम्रता) या दोन अभिन्न बाबी आहेत. म्हणून ज्ञाता हा नम्र असावा, जिज्ञासू असावा असे गीता म्हणते. ज्ञात्याजवळ सेवाभाव हा ही एक महत्वाचा गुण असावा. तो सेवाव्रती असावा. त्याने ज्ञानही सेवाभावी वृत्तीने मिळवावे आणि शेवटी मिळालेले ज्ञान सेवाभावी वृत्तीनेच वापरले तर त्या ज्ञानाला सुगंध येतो. म्हणजेच ज्ञात्यामध्ये नम्रता, जिज्ञासा आणि सेवा या तीन गोष्टी आणि गुरूनिष्ठा असेल तर त्याच्या ज्ञानाचा कीर्तिसुगंध सर्वत्र दरवळण्यास मदत होते व असे ज्ञान समाजाच्या उद्धारासाठी उपकारक ठरते.

भगवद्गीता ज्ञान देणारा गुरू कसा असावा याकडेही लक्ष वेधते 'उपदेश्यन्ति ते ज्ञानं ज्ञानिनसत्त्वदर्शिनः (४-३४). भगवद्गीता गुरू तत्त्वदर्शी असला पाहिजे असे म्हणते. ज्ञानाचा उपदेश करणारा मनुष्य ज्ञानी तसेच तत्त्वदर्शी असावा, ज्ञानसमृध्द असावा. गुरू तत्त्वदर्शी असावा असे म्हणण्याचे कारण म्हणजे त्याच्या जीवनात तपश्चर्येचे पाठबळ, ज्ञानाची खोली आणि अनुभवाचे सार असले पाहिजे, ज्ञानाची खोली ज्याने गाठली आहे आणि ही खोली गाठण्यासाठी सर्व मानवी अनुभवांची चिकित्सा करून त्याद्वारे मूलभूत तत्त्वांचे आत्मसातीकरण केले आहे तोच तत्त्वदर्शी गुरूपदास पोहचू शकतो. कारण जीवनप्रवाहातून अनेक अनुभवांचे संचित प्राप्त करून त्याद्वारे जीवनविषयक तत्त्वाज्ञानाचे प्रतिपादन, निरूपण करण्याची ताकद अशा गुरूंकडेच असते भगवद्गीतेतील ज्ञानशास्त्र हे आजच्या काळात समाजाला अत्यंत उपयुक्त ठरणारे आहे.

मनःशांतीसाठी भगवद्गीतेतील मूल्यमीमांसा (नितिशास्त्र)

आज संपूर्ण जग भौतिकतेकडे आकर्षिकले जात आहे. त्यामुळे आत्मशांती, मनःशांती, आत्मिक सुखांपासून दूर जात आहे. अशा परिस्थितीत आध्यात्मिक उन्नतीचा मार्ग स्वीकारण्याची प्रेरणा आपणास गीतेमधून मिळते. आजचे युग हे मानसिक ताणतणावांचे युग मानले जाते. या ताणतणावांपासून मुक्त होवून आत्मशांतीचा मार्ग शोधण्याची प्रेरणा गीतेतील तत्वज्ञानातून, नीतिशास्त्रातून आपणास मिळते. संपूर्ण जग अस्थिरतेने ग्रासलेले आहे. अशा परिस्थिती गीतेतील नैतिक शिकवणीच्या माध्यमातून आत्मशांती, आत्मोन्नतीचा संस्कार करण्यासाठी गीतेतील विचार अत्यंत उपयुक्त, मार्गदर्शक ठरणारे आहेत.

भगवद्गीता हा एक आदर्श नीतिपाठच आहे. भारतीय नीतिशास्त्र, मूल्यशास्त्र हे गीतेमध्ये पूर्ण विकसित झालेल्या अवस्थेत आपणास पहावयास मिळते. मानवी जीवनाला मार्गदर्शक ठरणा-या आध्यात्मिक, नैतिक, पारलौकिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक, भौतिक इत्यादी मूल्यांची जणू श्रेणीच गीतेमध्ये तयार झालेली आहे. नीतिवाद - अनीतिवादावरील विवेचन अत्यंत साक्षेपी भूमिकेतून प्रतिपादन करण्यात आलेले आहे. त्याबरोबरच गीतेमध्ये आत्मानंदाचाही विचार आलेला आहे. आचरणाच्या प्रमाणांची तर अत्यंत साधार चर्चा झालेली आहे. आचरणाची ही प्रमाण सर्वच काळात आणि अखिल मानवजातीला प्रेरणादायी, मार्गदर्शक ठरतील. आत्मशांतीचा मार्ग अनुसरण्याची प्रेरणा देतील यादृष्टीने गीतेतील नैतिक मानंदडाचे विवेचन अत्यंत समृध्दपणे करण्यात आलेले आहे.

भगवद्गीतेतील नैतिकतेची प्रमाणं (नैतिक मानदंड)

गीतेमध्ये नैतिकतेच्या प्रमाणांची म्हणजेच नैतिक मानंदडांची अत्यंत साधार चर्चा झालेली आहे. ती त्याचप्रमाणे आहे.

१) श्रेष्ठ व्यक्तींच्या आचरणाचे अनुकरण

समाजातील श्रेष्ठ व्यक्तींच्या आचारणाचे अनुकरण सामान्यजन करतात हे नैतिकतेचे एक प्रमाण गीतेमध्ये आहे. खरतर या प्रमाणाची सर्वच काळात समाजाला आवश्यकता भासलेली आहे. आजही या प्रमाणाची समाजाला नितांत गरज आहे. समाजातील श्रेष्ठ व्यक्तींनी गीतेतील नीतीमार्गाचे अनुसरण केले तर निश्चित सामान्यजनांसाठी ते अनुकरणाचे आदर्श मानदंड ठरतील. नासलेल्या, कुजलेल्या विचारांचे, कृतींचे आणि वृत्तीचे समूळ उच्चाटन करण्यासाठी हा एक नैतिक मानदंड आज आपणास उपयुक्त ठरणारा आहे. या मार्गाच्या अनुसरणाने निश्चितच समाजाला मनःशांतीचा आत्मशांतीचा लाभ होवू शकेल.

२) आत्मनिर्णयाचे तत्त्व

गीतेमध्ये नैतिक मापदंडातील दुसरे प्रमाण म्हणजे आत्मनिर्णयाचे तत्त्व. गीतेमध्ये निर्णयाची तीन तत्त्वे प्रतिपादन करण्यात आलेली आहेत. आत्मनिर्णय, परनिर्णय आणि ईश्वरीनिर्णय अशी ही तीन तत्त्वे आहेत. परंतु आत्मनिर्णयाच्या तत्त्वाला गीतेमध्ये अधिक महत्त्व दिलेले आहे. जेव्हा अर्जुन श्रीकृष्णाला म्हणतो आता माझा मोह गेला असून मनाचा संदेह मिटला आहे. आता तुम्ही सांगाल ते

मी करीन. इथे ईश्वरी निर्णयाचे तत्त्व पहावयास मिळते. परंतु श्रीकृष्ण म्हणतात, ईश्वरी निर्णय हा देखील एका अर्थाने परनिर्णयच आहे. आता तुला पाहिजे ते तू कर (१८-६३). म्हणजे इथे स्वतःच स्वतःचा नैतिक मानदंड बनण्याची प्रेरणा मिळते. हेच ते आत्मनिर्णयाचे तत्त्व होय. मात्र याचा अर्थ ज्याला जे वाटेल ते त्याने करावे असा नाही. तर समबुध्दी झालेल्यांकडून, पूर्णावस्थेस पोहोचलेल्यांकडून पाप घडणे किंवा विकृत निर्णय घेण्याची शक्यताच नसते. म्हणजेच ईश्वरी आज्ञा व मानवी इच्छा यातील अंतर संपते तेव्हा व्यक्ती स्वतःच स्वतःच नैतिक मानदंड बनू शकते. केवढा उदात्त विचार गीतेने जगाला बहाल केला आहे. समाजात या नैतिक मानंदडाचे जर प्राबल्य वाढले तर आपोआपच असा समाज मनःशांतीचा अनुभव घेण्यास पात्र ठरेल.

आचारणाच्या दोन बाजू

गीतेने व्यक्तीच्या आचारणाचे केलेले विश्लेषणही अत्यंत उपयुक्त आहे. गीतेमध्ये आचारणाच्या दोन बाजूंची अत्यंत संयुक्तिक चर्चा झालेली आहे. सद्गुणसेवन आणि दुर्गुणत्याग अशा या आचरणाच्या दोन बाजू होत. सद्गुणसेवन ही भावात्मक बाजू तर दुर्गुणत्याग ही अभावात्मक बाजू होय. गीतेमध्ये सद्गुणांची चर्चा वारंवार आलेली आहे. अमान्वित्त्व, अंदभित्त्व, अहिंसा, शांती, आर्जव, आचार्योपासना, शौच, स्थैर्य, आत्मनिग्रह, आत्मौपम्यबुध्दी इत्यादी सद्गुणानांच ज्ञान म्हटले आहे. (१३७:१९) या सद्गुणानांच दैवी संपत्ती मानले आहे. शुद्ध सात्विकवृत्ती, स्वाध्याय, दान, दम, तप, सत्त्व, अक्रोध, उदारबुध्दी, दया, तेजस्विता, शूचिर्भूतता, निरहंकार इत्यादी दैवी संपतीचे लक्षण आहे तर विषयांच्या ठायी गोडी निर्माण झाली की कामक्रोधादी विकार उत्पन्न होवून अखेर त्याचा सर्वस्वी घात होतो (२-६२.६३) असे गीतेमध्ये अत्यंत समर्पकपणे विवेचन करण्यात आलेले आहे. या कामशत्रूंचा नाश आत्मज्ञानानेच केला पाहिजे. प्रवृत्ती व निवृत्ती न जाणणारे, दुराचारी, निरिश्वरवादी, दंभ, मान, मद यांनी व्यापलेले, आशा-पाशांनी बद्ध, भ्रम व अहंकार यांनी ग्रस्त, आत्मश्लाधी, क्रुर असे नष्टात्मे म्हणजे आसुरी संपत्तीचे लोक नरकाचे धनी होतात. म्हणजेच दैवी संपत्ती मोक्षास कारण ठरते तर आसुरी संपत्ती बंधास कारण ठरते. यावरून आपणास असे म्हणता येईल की, मानवी आचरणाचे विविध पातळयांवरील नैतिक मानदंड निर्धारीत करून एक आदर्श नीतीपाठ गीतेमधून सामान्य माणसांपुढे प्रस्तुत केलेला आहे.

आज समाजातील मानवी वर्तनाचे सूक्ष्म अवलोकन केले असता दैवी आणि आसूरी वृत्तीचे आपणास दर्शन घडते. आसुरी गुणांमुळे समाज विपन्नावस्थेला जात आहे. या पार्श्वभूमीवर समाजातील प्रत्येक मानवी घटकात दैवी गुणांचे प्रमाण वाढले तर नक्कीच समाजातील अंदाधुंद, व्यभिचार, नफेखोरी, भ्रष्टाचार इत्यादींना आळा बसेल आणि सात्त्विक वृत्तीचे समाजमन तयार होण्यास मदत होईल अशा समाजाला आत्मशांती, मनःशांती शोधण्यासाठी कोणत्याही बाहय मार्गाचा आधार घेण्याची आवश्यकता भासणार नाही.

सुखाच्या कल्पनेचा विचार

भगवद्गीतेमध्ये सुखाच्या कल्पनेचाही विचार अत्यंत प्रगल्भ स्वरूपात झालेला आहे. चिरंतन, नित्य सुख विषयात नाही तर ते बुध्दी आत्मनिष्ठ झाल्यावर मिळते आणि त्यातून मिळणारा आध्यात्मिक आनंदच श्रेष्ठ आहे. हा एक नीतिपाठ गीतेतून जनसामान्यांना मिळतो. आजच्या क्षणिक सुखाचा मागे लागून आत्मज्ञान, आत्मशांती व आत्मभान गमावलेल्या जगाला गीतेतील नीतिशिक्षण अत्यंत उपयुक्त ठरणारे आहे.

कर्मयोगाचा सिद्धांत

गीता व्यक्तीला जीवनात उदात्त आदर्श निर्माण करण्याची प्रेरणा देते. त्यातील प्रेरणेचा एक स्त्रोत म्हणजे 'कर्मयोगाचा' सिद्धांत होय. फलाची आशा सोडून म्हणजेच निष्काम कर्म करण्यावर विशेष भर देणारा असा हा सिद्धांत आहे. म्हणजेच आशा, अपेक्षा विरहीत वृत्तीने व्यक्तीने काम केले तर मिळालेल्या फळाचा दुरभिमानही निर्माण होण्याचे कारण नाही व फळ नाही मिळाले तरी त्यामुळे दुःखही येणार नाही. यामध्येही नैतिक शिकवणीचे सार दडलेले आहे. म्हणूनच गीतेमध्ये कर्म व ज्ञान यात फरक नसल्याचे म्हटले आहे (५.५). प्रत्येकाने आपल्या विहित कर्मात नित्यरत असावे हाच स्वधर्म. प्राणावर बेतले तरी स्वधर्म सोडू नये (३-३५). हा धर्म-अधर्माचा विचार गीतेमध्ये अत्यंत उदात्त स्वरूपात आला आहे. स्वधर्माची ही परिभाषा प्रत्येकाने स्वीकारली आणि त्याप्रमाणे जीवनमार्ग अनुसरला तर आपोआपच अधर्माचे उच्चाटन होण्यास मदत होईल. आणि जिथे स्वधर्माचे प्रामाणिकपणे, निष्ठेने पालन केले जाते अशा समाजाला मनःशांती, आत्मशांतीसाठी कोणत्याही बाहय उपयांची आवश्यकता नसते हा अत्यंत उदान्त विचार गीतेने अखिल विश्वाला बहाल केलेले आहे.

चित्तशुद्धीः नैतिकतेचे आंतरिक लक्षण

भगवद्गीता हा एक आदर्श नीतिपाठ आहे या नीतिपाठातील सुसंस्काराचा कळस म्हणजे चित्तशुद्धीला दिलेले आत्यंतिक महत्त्व होय. चित्तशुद्धी हे नैतिकतेचे आंतरिक लक्षण. चित्ताच्या शुध्दीमुळे कर्म-अकर्म, धम-अधर्म, सत्य-असत्य, योग्य-अयोग्य, सार -असार यातील भेद समजयासाठी मनुष्य समर्थ बनतो आणि पर्यायाने सद्गुणांचे आत्मसातीकरण होण्यास मदत होते म्हणून सत्चिदानंदाची अनुभूती येण्यासाठी चित्तशुध्दीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. वर्तमानकाळातील चित्तभ्रम झालेल्या, मोहमायेच्या पसा-यात अडकून पडलेल्या समाजाला गीतेतील हा सुसंस्कार आत्मशांतीसाठी निश्चितच उपयुक्त ठरू शकेल यात तीळमात्रही शंका नाही.

भक्तीः सद्गुणांचा मुकूटमणी

भगवद्गीतेमध्ये भक्तीयोगाचे गोडवे गायिलेले आहे. त्यामुळेच सर्व सद्गुणांचा मुकूटमणी म्हणजे भक्ती आहे याकडे गीता लक्ष वेधते. ईश्वराला भक्त अतीव प्रिय आहे सर्व नैतिक गुणांनी युक्त भक्त ईश्वराला अभिप्रेत आहे. आपली सर्व कर्मे कृष्णभावनाभावित असावीत म्हणजेच ईश्वरी भावनेनेच युक्त असावीत आणि ती त्या ईश्वरालाच समर्पित करावीत हा अत्यंत उदात्त विचार कर्माच्या संदर्भात गीतेत आलेला आहे. या भावनेने युक्त कर्मामध्ये स्वार्थलोलूपतेचा पूर्णतः अभाव

असेल आणि त्यामुळे अनाचार, भ्रष्टाचाराला येथे कोणताही थारा असणार नाही हा विचार आजच्या समाजाला आत्मोन्नतीसाठी आणि मनःशांतीसाठी खूपच प्रेरक ठरणारा आहे.

गीतेतील हा ज्ञानयोग, भक्तियोग, कर्मयोग यांचा त्रिवेणीसंगम अतुलनीय आहे म्हणून भगवद्गीता हा भारतीय परंपरेतील एक असा नीतीपाठ आहे जो समाजाच्या सर्वांगीण प्रगतीस आजच्या काळातच नव्हे तर सर्वच काळात उपकारक ठरणारा आहे.

गीतेतील जीवनस्पर्शी तत्त्वज्ञान म्हणजे जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत उपकारक, मार्गदर्शक, प्रेरक ठरणारे हे तत्त्वज्ञान आहे. त्याचे पुन्हा पुन्हा अवलोकन केले असता त्यातून नवनवे पैलू उलगडतात यातच त्याचे सार दडलेले आहे.

थोडक्यात भगवद्गीता हा केवळ तात्त्विक विवेचन करणारा ग्रंथ नसून मानवाला जीवनाच्या प्रत्येक टप्यावर नैतिक आदर्श प्रस्थापित करण्यासाठी आचारणाचा एक कृतिपाठ आहे. आजच्या अस्थिर, अशाश्वत अशा समाजाला स्थैर्य, शाश्वत तत्वांनुसार जीवनमार्ग निर्धारीत करण्याचे मार्गदर्शन गीतेमधून समर्थपणे मिळते. आणि अशी शाश्वत तत्त्वे समाजाला नीतिमान व गतिमान करण्यासाठी उपकारक ठरतात. म्हणून भगवद्गीतेतील प्रत्येक बोध हा अखिल मानव जातीला आत्मोन्नतीचा, आत्मशांतीचा आणि मनःशांतीचा प्रेरणास्त्रोत आहे. गीतेतील या प्रेरणास्त्रोतांचा उपयोग करून जीवनमार्ग अनुसरणारा समाज विश्वावर अधिराज्य करण्यास समर्थ ठरेल यात शंकाच नाही.

संदर्भग्रंथ सूची

१. जोशी, लक्ष्मणशास्त्री, (१९८५), मराठी विश्वकोश (खंड -१२), मुंबई : महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ.
२. दीक्षित, श्रीनिवास, (२०१५), भारतीय तत्त्वज्ञान, कोल्हापूर : फडके प्रकाशन.
३. मोहरीर, ल.का. (संपा.), (२००७), भारतीय शिक्षण विचार, देवगिरी प्रांत : भारतीय शिक्षण मंडळ.
४. वाडेकर, देविदास दत्तात्रय (संपा.), (१९७४), मराठी तत्त्वज्ञान-महाकोश (त्रिखंडात्मक), खंड दुसरा, पुणे : मराठी तत्त्वज्ञान-महाकोश मंडळ.